नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

दिनांक 20/03/2021 (शनिवार)
(दुपार)

---

## फसवणुक

पो.स्टे. रामटेक :– अंतर्गत 1 कि मी अंतरावर रामटेक येथे दिनांक 24/07/2020 चे 12.21 वा. ते दिनांक 27/07/2020 चे 11.19 वा. सुमारास फिर्यादी नामे– उद्दल बालाजी हटवार, वय 48 वर्षे, रा. राजाजी वार्ड रामटेक यांनी आपले मोबाईल वरून फोन पे चा वापर करून (क्रेजी डील डॉट कॉम) crazi deal.com कंपनीकडुन रिअल मी नारजो–10 (real mi narzo–10) मोबाईल किमत 11,999/– रू चा ऑर्डर केला. सदर कंपनीने फिर्यादीचा मोबाईल न पाठवता कि. 11,999/– रू. ची आर्थीक फसवणुक केली आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. रामटेक येथे आरोपीविरुध्द कलम 420 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरु आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार मनोहर राउत मो.न. 9423628307 हे करीत आहे.

## अपघातात मृत्यु

पो.स्टे. खापरखेडा :– अंतर्गत 3 कि.मी. अंतरावरील चनकापुर येथे दिनांक 18/03/2021 चे 19:30 वा. ते 20.00 वा. दरम्यान एमएच–40/सीई मोटरसायकलचा चालक नामे– पृथ्वीराज कोहवते व त्याचा भाचा सौरभ परतेती, वय 04 वर्ष यास खाउ घेण्यास त्याच्या मोटरसायकलने खापरखेडा कडुन दहेगाव कडे जाणारी पाढंऱ्या रंगाची क्रेटा कार क्रं. एमएच–31/ एफए–7914 च्या चालक आरोपी नामे– कनिष्कराज विमनसुर्य चिमनकर, वय 26 वर्ष, रा. जुना फुटाला नागपूर याने आपल्या ताब्यातील कार भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन मोटरसायकला धडक दिली. या अपघातात मोटरसायकल चालक याचे डाव्या हाताला मार लागुन तो जखमी झाला. तर त्याचा भाचा सौरभ यास कपाळाला मार लागल्याने त्यास उपचाराकामी ॲलेक्सिस हॉस्पीटल नागपुर नेले असता तो मरण पावला. मोटरसायकल चालक जखमी मेयो हॉस्पीटल नागपुर येथे भरती आहे.

सदर प्रकरणी सर तर्फे पोउपनि मनोज मेश्राम पो स्टे खापरखेडा यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 338, 304 (अ) भादंवी. सहकलम 184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि मनोज मेश्राम मो क्र 9423115260 हे करीत आहे.

## गळफास लावून मृत्यु

पो.स्टे. खापरखेडा :– अंतर्गत दहेगाव वार्ड क्र. 4 येथे दिनांक 18/03/2021 चे 19:30 वा. सुमारास फिर्यादीचा मोठा भाउ नामे– रामेश केदार श्रीवास (मृतक), वय 35 वर्ष, रा. दहेगाव वार्ड क्र. 4 याने त्याचे राहते घरी अज्ञात कारणातुन सिलींग फॅनला लोखंडी कळीला नायलॉन दोरीने गळफास घेतल्यानंतर तो मृत अवस्थेत आढळून आला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– दिनेश केदार श्रीवास, वय 30 वर्ष, रा. दहेगाव रंगारी वार्ड क्र. 4 यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. खापरखेडा येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास सुरू आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर